अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वर्गणीचे दर :

वार्षिक : ६ रु.

सहामाही : ३ रु.

किरकोळ : २ आ.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT

Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख ७ मार्च, १९५६ | अंक १०

## विविध माहिती

**मलायलम् भाषेंतील ज्ञानकोष**—मलायलम् भाषेंतील पहिला ज्ञानकोष तयार करण्याचें कार्य त्रावणकोर–कोचीनच्या राजप्रमुखांच्या पुरस्कारानें सुरू झालें आहे. ज्ञानकोषाची पृष्ठसंख्या ६,००० होईल आणि तो ६० मासिक पुस्तकांच्या रूपानें प्रसिद्ध करण्यांत येईल. ज्ञानकोषाला 'विज्ञानम्' असें नांव देण्यांत येणार असून तो सोप्या भाषेंत लिहिण्यांत येणार आहे.

**अलीगड विद्यापीठाला देणगी**—इराणच्या शहांनीं अलीगड विद्यापीठाला दरसाल ५,००० रुपयांची देणगी देण्याचा मानस व्यक्त केला आहे. पर्शिअन भाषेंतील पुस्तकांच्या हिंदी व उर्दू भाषांतील आवृत्त्या प्रसिद्ध करण्यासाठीं रकमेचा उपयोग करण्यांत येणार आहे. ह्याशिवाय भारतीय भाषांतील पुस्तकांचें पर्शिअन भाषेंत भाषांतर करण्याचें कामहि इराणचें विद्याखातें करणार आहे.

**शिक्षितांची बेकारी**—त्रावणकोर–कोचीन राज्यांत ग्राम–सेविकांच्या १५ जागांसाठीं अर्ज मागविण्यांत आले असतां ३,००० शिक्षित स्त्रियांनीं अर्ज केल्याचें आढळून आलें. त्यांपैकी कांहीं पदवीधर होत्या. राज्यांत सुमारें ४९,००० वर सुशिक्षित बेकार असून त्यांच्या संख्येंत दरसाल ३०,००० पेक्षा अधिकांची भर पडत असते.

**कागदाची मोठी गिरणी**—कागदाची निर्मिति करणाऱ्या दोन मोठ्या कारखान्यांनीं एकत्र येऊन एक मोठें कॉर्पोरेशन स्थापन करण्याचें ठरविलें आहे. त्यांतील एक कंपनी ब्रिटिश असून दुसरी अमेरिकन आहे. दोन्ही कंपन्यांनीं मिळून इंग्लंडमध्यें कागदाचा मोठा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे.

**द्राक्षांचें अखिल भारतीय प्रदर्शन**—इंडिअन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च ह्या संस्थेनें हैदराबाद येथें द्राक्षांचें अखिल भारतीय प्रदर्शन भरविण्याचें ठरविलें आहे. प्रदर्शन १७ मार्चपासून तीन दिवस चालेल. भारताला सध्यां द्राक्षांची आयात करावी लागते. उत्तर व दक्षिण भारतांत द्राक्षांच्या लागवडीचें क्षेत्र अधिक विस्तृत करण्याचे प्रयत्न संस्था करणार आहे.

**मध्यप्रदेशांतील बेकारी**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत मध्यप्रदेशांतील बेकारीच्या प्रश्नाची पाहणी करण्याचें राज्य सरकारनें ठरविलें आहे. ही पहाणी बरीच तपशीलवार करण्यांत येणार असून तीसाठीं सरकारला २ लाख रुपयांहून अधिक खर्च येईल.

**चॅपलिनचा नवा बोलपट**—जगप्रसिद्ध विनोदी नट चार्ली चॅपलिन ह्यांनीं 'राजा न्यूयॉर्कला जातो' ह्या नांवाचा बोलपट काढण्याचें ठरविलें आहे. एक पदच्युत झालेला राजा न्यूयॉर्क-मध्यें जातो व तेथें एका अमेरिकन तरुणीचें त्याच्यावर प्रेम बसतें, अशी बोलपटाची कथा आहे. राजाचें काम चॅपलिन करणार असून बोलपट शुद्ध विनोदी करण्याचा त्याचा हेतु आहे.

**जेसलमीरनजीक तेलाचा शोध**—जेसलमीरनजीक भूमिगत तेलाचा शोध करण्याचें काम भारतीय सरकारनें चाल-विलें आहे. ह्या कामांत मदत करण्यासाठीं कॅनडांतील तंत्रज्ञ एक विमान घेऊन आले आहेत. तेलाचा शोध करण्यासाठीं लागणारीं अद्ययावत् साधनें विमानांत आहेत. ही मदत कोलंबो योजनेप्रमाणें भारताला देण्यांत येत आहे.

**धारवाड शहराची सुधारणा**—धारवाड शहराची सुधारणा करण्याच्या ज्या योजना आंखण्यांत आल्या आहेत, त्या पूर्ण करावयाच्या झाल्यास ३० लाख रुपये लागतील असें म्युनिसि-पालिटीचे प्रशासक श्री. परुळेकर ह्यांनीं जाहीर केलें आहे. ही रक्कम कर्जाच्या रूपानें उभी करून १५ वार्षिक हप्त्यांत परत करणें शक्य होईल असें त्यांचें मत आहे.

**संत्र्यांच्या लागवडीला मदत**—संत्र्यांची प्रत सुधारून त्यांच्या विक्रीची सहकारी पद्धतीची व्यवस्था करण्याची योजना मध्यप्रदेश सरकारनें तयार केली आहे. संत्र्यांचें उत्पादन व विक्री करणाऱ्या खास सहकारी संस्था स्थापन करण्यांत येणार आहेत. ह्या कामासाठीं सरकार ७·२५ लाख रुपये भांडवल घालणार आहे.

**विमानतळांची सुधारणा**—मध्यवर्ती सरकारनें तिरु-चिरापल्ली, कोइमतूर आणि मदुरा येथील विमानतळांची सुधारणा करण्याचें ठरविलें आहे. तिरुचिरापल्ली येथील विमानतळाजवळ एक आणि कोइमतूर विमानतळाजवळ एक अशा दोन इमारती बांधण्यांत यावयाच्या आहेत. त्यांना अनुक्रमें ५ लाख व १८ लाख रुपये खर्च येईल.

**कुंभकोणम् येथील विशाल जत्रा**—कुंभकोणम् येथें १२ वर्षांनीं मोठी यात्रा भरत असते. ह्या वर्षीं भरलेल्या यात्रेंत तेथील पवित्र कुंडांत १० लाख भाविकांनीं स्नान केलें. यात्रेला इतकी गर्दी झाली कीं एका दिवसांत १०० खास रेल्वे गाड्यांनीं ३½ लाख यात्रेकरूंनीं गांवांत प्रवेश केला. यात्रेंत भिकारी आणि रोगी ह्या लोकांना येण्यास पूर्णपणें मज्जाव केला होता.

## दुसरी पंचवार्षिक योजना
### ग्रामीण व छोटे उद्योगधंदे

नियोजित आर्थिक विकास लक्षांत घेऊन ग्रामीण व छोट्या उद्योगधंद्यांच्या विकासाकडे कोणत्या मूलभूत दृष्टिकोनांतून पाहावें याबाबतच्या प्रश्नांचा विचार 'कर्वे समिती' या नांवानेंच अधिक परिचित झालेल्या 'ग्रामीण व छोटे उद्योगधंदे (दुसरी योजना) विषयक समितीनें' आपल्या अहवालांत केला आहे. आणि अशा रीतीनें पहिल्या योजनेंत आंखलेल्या धोरणांतील दृष्टीनुसार पुढील टप्पा गांठण्यांत आला आहे.

कर्वे समितीनें तीन महत्त्वाचे हेतु पुढें ठेवून आपल्या शिफारसी केल्या. हे हेतु असे:—तांत्रिक ज्ञान असणाऱ्यांच्या बाबतींत, विशेषतः परंपरागत धंद्यांत अधिक बेकारी माजण्याची परिस्थिति दुसऱ्या योजनेच्या काळांत शक्यतों टाळणें, निरनिराळ्या छोट्या व ग्रामीण धंद्यांत शक्य तितक्या अधिक प्रमाणांत नोकऱ्यांची व कामधंद्यांची तरतूद करणें आणि मुख्यत्वें विकेंद्रित समाजरचनेच्या उभारणीचा पाया तयार करून झपाट्यानें अधिकाधिक आर्थिक विकास होण्याची तरतूद करणें.

सर्व देशभर विखुरलेल्या मोठ्या गांवांतून व लहान लहान शहरांतून आवश्यक त्या सोयी करून छोट्या छोट्या उद्योगधंद्यांचें जाळें प्रसरावयाचें आहे. ग्रामीण उद्योगधंद्यांचा क्रमशः विकास करणें व त्यांत आधुनिकता आणणें या गोष्टी यामुळें उत्तम तऱ्हेनें साध्य करतां येतील. मोठ्या शहरांच्या परिसरांत होणाऱ्या औद्योगिक विकासानें उद्योगधंद्यांचें केंद्रीकरण कमी होईल असें वाटत नाहीं. नवीन औद्योगिक वसाहतींची स्थापना करण्यानें साधनसामग्रीचा अपव्यय होण्याचा संभव आहे.

स्थूलमानानें पाहतां दुसऱ्या योजनेंतील ग्रामीण व छोट्या उद्योगधंद्यांबाबतचा दृष्टिकोन पुढील तीन परस्परावलंबी गोष्टींशीं संबद्ध आहे: (१) एकाच धंद्यांतील छोट्या व मोठ्या घटकांचा उत्पादनाचा कार्यक्रम एकच असणें, (२) विकेंद्रित औद्योगिक उत्पादनांची इष्टता, (३) तांत्रिक मार्गदर्शनाद्वारें पैशाच्या व सामग्रीच्या मदतीद्वारें, संशोधन आणि शिक्षणाद्वारें आणि सहकारी संघटनाद्वारें छोट्या उद्योगधंद्यांना पाठिंबा देण्याचा सक्रिय कार्यक्रम आंखलेला असणें.

### संघटनांचें जाळें

ग्रामीण व छोट्या उद्योगधंद्यांच्या विकासाचे कार्यक्रम अंमलांत आणण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें गेल्या तीन वर्षांत अनेक संघटना स्थापन केल्या आहेत. अ. भा. खादी व ग्रामोद्योग मंडळ, हस्तव्यवसाय मंडळ, हातमाग मंडळ, छोटे उद्योगधंदे मंडळ, काथ्या मंडळ आणि रेशीम मंडळ या त्या संघटना होत. या मंडळांद्वारें छोट्या धंद्यांच्या विकासासाठी पहिल्या योजनेच्या काळांत एकूण ३१·२ कोटी रु. खर्च करण्यांत आले आहेत.

या मंडळांनीं तयार केलेल्या योजनांचा नियोजन मंडळाच्या ग्रामीण व छोटे उद्योगधंदे समितीनें विचार करून दुसऱ्या योजनेंत या धंद्यांच्या विकासासाठी २६० कोटी रु. खर्चाची शिफारस केली. योजनेंत प्रत्यक्ष तरतूद २०० कोटी रु. करण्यांत आली आहे.

### खर्चाची वांटणी

ग्रामीण व छोट्या धंद्यांसाठी राखून ठेवलेल्या रकमेंत खेळत्या भांडवलासाठी तरतूद आहे. कुटीरोद्योगांसाठी, छोट्या उद्योगधंद्यांसाठी अल्प व मध्यम मुदतीचीं कर्जे देऊन मदत करण्याची तयारी रिझर्व्ह बँकेनें दर्शविली आहे. लवकरच या धंद्यांसाठी लागणारें खेळतें भांडवल सहकारी व इतर बँकांद्वारें मिळूं लागेल.

या धंद्यांच्या विकासाचें काम योजनेच्या कार्यवाहीसाठी केलेल नेहमींच्या कारभारात्मक व्यवस्थेपासून फार काळ दूर ठे चालणार नाहीं, असें ग्रामीण व छोटे उद्योगधंदेसमितीनें मुद्दा निदर्शिलें आहे. तथापि, सध्यां बऱ्याच राज्यांतील एतद्विषय संघटना बलिष्ठ नसून दुसऱ्या योजनेंत संकल्पिलेली जबाबदा पेलण्याच्या दृष्टीनें तर जिल्ह्याजिल्ह्यांतूनहि संघटना सुसज नाहीं. म्हणून राष्ट्रीय विस्तारसंघटनेच्या मदतीनें राज्यांनीं अ संघटना उभारण्याची वेळ आली आहे.

### ग्रामीण व छोटे उद्योगधंदे

उत्पादनाचीं क्षेत्रें ठरवून देणें हा छोट्या धंद्यांना प्रत्यक्ष मद करण्याचा एक उपाय आहे. आवश्यक त्या धंद्यांच्या बाबतींत धोरण अंगिकारावें लागेल. उद्योगधंदे उभारण्यासाठी परवान्यांच जरूरी असण्याचें धोरण शेतमालावर प्रक्रिया करण्याच्या म्हणजे भात सडण्याच्या गिरण्या, पिठाच्या गिरण्या, तेलाच्या गिरण्य यांसारख्या धंद्यांच्या बाबतींतहि लागू केलें पाहिजे. योग्य त्य परिस्थितींत मोठ्या धंद्यांतील मालावर कर (सेस) किंव अबकारी जकात बसविणें हाहि छोट्या उद्योगधंद्यांना मद करण्याचा एक उत्तम आर्थिक उपाय असून, प्रत्येक प्रकरणाच गुणवत्तेनुसार विचार करावयास पाहिजे.

अंबर चरख्याचा वापर करण्याचा प्रश्न थोडा वेगळा आहे. या प्रश्नांतील तांत्रिक व आर्थिक बाजूंचा विचार करण्यांत येत आहे. एतद्विषयक संशोधनाच्या व शिक्षणाच्या एका योजनेसाठी मध्यवर्ति सरकारनें अलिकडेच ३० लक्ष रु. मंजूर केले आहेत या संबंधांतील चौकशीचे निष्कर्ष लवकरच हातीं येतील आणि त्यानंतर थोड्याच महिन्यांत संघटित कापड गिरणी धंद्याचे कापड व सूत उत्पादनाचें लक्ष्य निश्चित करण्यांत येईल.

बहुतेक सर्व छोट्या धंद्यांच्या बाबतींत पुरवठा व विक्रय यांच्या सहकारी संस्थांना खूप वाव आहे. विजेचा व यंत्राचा उपयोग कराव्या लागणाऱ्या छोट्या धंद्यांच्या बाबतींत साहसाबरोबरच कौशल्य दाखविणाऱ्या व्यक्तींना चांगलें स्थान असून, सुशिक्षितांना यांपैकी कांहीं धंदे सुरू करतां येण्याजोगे आहेत. ज्या धंद्यांत अशा सहकारी संस्था आहेत त्या बाबतींतहि सरकार कांहीं प्रमाणांत आर्थिक जबाबदारी पत्करूं शकेल आणि उत्पादनांतील सातत्य टिकविण्यासाठी मर्यादित प्रमाणांत सरकार हमी देऊं शकेल.

पुरवठा आणि विक्रय यांच्या सहकारी संस्था व उत्पादक सहकारी संस्था संघटित करण्यासाठी राज्यांराज्यांतील उद्योगधंदेविषयक खात्यांची यंत्रणा महत्त्वाच्या शहरीं केंद्रांतील आणि खेड्यांच्या गटांतील कारागिरांप्रत पोंचण्याच्या दृष्टीनें वाढविणें जरूरीचें आहे. इतर क्षेत्रांप्रमाणेंच याहि क्षेत्रांत सहकारी चळवळ हा विकासाचा एक टप्पा असून, भक्कम, आर्थिक व संघटनात्मक पायाची जोड दिली तर सहकाराचें पाऊल पुढेंच पडत जातें.

राज्य सरकारांनीं आपापल्या योजनांत औद्योगिक वसाहतींच्या अनेक योजना समाविष्ट केल्या आहेत. मुंबई, दिल्ली, कानपूर सारख्या मोठ्या शहरांनजिक यांपैकी कांहीं वसाहती स्थापन करण्यांत येतील. कांहीं वसाहती आग्रा, नागपूर, जयपूर, विजयवाडा, बडोदें, इंदूर व ग्वाल्हेर यांसारख्या मध्यम आकारमानाच्या शहरांनजिक आणि बाकीच्या त्यामानानें लहान शहरांनजिक वसविण्यांत येतील. औद्योगिक वसाहती स्थापन करण्यासाठी जागा निश्चित करतांना याबाबत ग्रामीण व छोटे उद्योगधंदे समितीनें या विषयांवर व्यक्त केलेलीं मतें राज्य सरकारांनीं विचारांत घ्यावीत असें सुचविण्यांत आलें आहे.

# अर्थ

बुधवार, ता. ७ मार्च, १९५६





*संस्थापक :*
प्रो. वामन गोविंद काळे

*संपादक :*
श्रीपाद वामन काळे


## अर्थमंत्र्यांचें अर्थसंकल्पावरील भाषण

संसदेंत आपला ६ वा अर्थसंकल्प सादर करतांना अर्थमंत्री श्री. चिं. द्वा. देशमुख यांनीं वर्षभरांत झालेल्या आर्थिक प्रगती-बद्दल समाधान व्यक्त केलें. ते म्हणाले, कीं १९५५ सालामध्यें आर्थिक परिस्थितीमध्यें सर्व बाजूंनीं चांगली प्रगति दिसून आली. या वर्षांत उरलीं-सुरलीं अन्ननियंत्रणें काढून टाकण्यांत आलीं. औद्योगिक उत्पादनांत लक्षांत येण्याजोगी वाढ झाली. देण्या-घेण्याची परिस्थिति समाधानकारक असली तरी विकासाची वाढणारी गती लक्षांत घेतां यापुढें याबाबतचा ताण वाढेल. म्हणून निर्यात उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठीं हरप्रयत्न करणें आणि परकीय हुंडणावळींत इतर मार्गानें बचत करणें किंवा ती मिळविणें भाग आहे. जास्तींत जास्त काटकसर साधून उधळपट्टी टाळण्यासाठी एक खास उच्चाधिकार समिति नेमण्याची सूचना अर्थमंत्र्यांनीं केली. "कोणत्याहि देशास आर्थिक साधनसामुग्री पूर्णपणें दृष्टीपथांत नसतां आणि आयत्यावेळीं अधिक खर्चाची शक्यता असतांना, वास्तवाकडे नजर ठेवून आंखणें शक्य होईल तेवढी मोठी ही योजना आहे." असें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचें त्यांनीं वर्णन केलें. भांडवल गुंतणीचें प्रमाण राष्ट्रीय उत्पन्नाच्या हल्लींच्या ७ टक्के पातळीवरून सुमारें १२ टक्के पातळीवर जाईल आणि जनतेंतील सर्व जणांनीं आपल्या कुवतीनुसार खर्च करण्याबाबत आवश्यक संयम ठेवला तरच ही गोष्ट शक्य होईल. परकीय मदत स्वागतार्ह असली तरी तिला सहाजिकच मर्यादा असून बहुतेक सर्व उभारणी देशांतच समाजांतील बचतीचा उपयोग करून आणि वर्धमान करपद्धती अवलंबून करावी लागेल.

आर्थिक परिस्थितीचा आढावा घेतांना अर्थमंत्री म्हणाले, कीं १९५३ आणि १९५४ मध्यें देशांतील आर्थिक स्थिति सुधारली आणि १९५५ मध्यें भारताची आर्थिक स्थिति अधिक भरभक्कम झाली. मे, १९५५ मध्यें शेतमालाच्या किंमतींतील उतार थांबविण्यांत आला आणि नंतरच्या काळांत ह्याच वर्षी चढता रोख दिसून आला. बहुतेक उद्योगधंद्यांत उत्पादनानें उल्लेखनीय अशी वरची पातळी गांठली. तसेंच, शेतकी उत्पादनहि समाधानकारक राहिलें. कोरियन युद्धाच्या काळांतील तेजीपाठोपाठ आलेली मंदी जवळ जवळ संपुष्टांत आली. पहिल्या पंचवार्षिक योजनेमुळें आर्थिक घडी बरीच दृढ झाली व अधिक जलद्गति विकासाचा मार्ग मोकळा झाला.

१९५३ मध्यें घाऊक किंमती खाली उतरूं लागल्या आणि १९५४ मध्यें त्या बऱ्याच प्रमाणांत खाली उतरल्या. परंतु १९५५ च्या मे महिन्यापर्यंत किंमती घसरण्यास आळा बसला असून तेव्हांपासून त्यामध्यें सतत वाढ दिसून येत आहे. डिसेंबर १९५५ मधील किंमती डिसेंबर १९५४ मधील किंम-तींच्या पातळीवरच होत्या. अन्नपदार्थांच्या किंमतीचा निर्देशांक मे १९५५ मध्यें २८६·१ वर होता. त्यामध्यें वाढ होत जाऊन डिसेंबर १९५५ मध्यें तो ३२३·७ वर गेला आणि औद्योगिक कच्च्या मालाच्या किंमतींचा निर्देशांकहि ३९६·४ वरून ४३८·३ वर गेला. पक्क्या मालाच्या किंमती जवळजवळ स्थिर राहिल्या.

जनतेपाशीं असलेल्या पैशांत वर्षभरांत सुमारें ११ टक्क्यांनीं वाढ होऊनहि सबंध वर्षाचा अेकत्रितपणें विचार करतां सर्व-साधारणतः किंमतींत वाढ झाली नाहीं ही गोष्ट विशेष उल्लेखनीय आहे, असें अर्थमंत्री म्हणाले.

गतवर्षी शेतमालाच्या घसरत चाललेल्या किंमती हा काळ-जीचा विषय होऊन बसला होता. त्या किंमती घसरण्यास पायबंद घालण्यासाठीं सरकारनें केलेल्या उपाययोजनांचा उल्लेख अर्थमंत्र्यांनीं केला.

योग्य प्रकारें संघटित व सुसूत्र अशी कर्ज मिळण्याची व विक्रीची व्यवस्था असल्यावाचून शेतमालाच्या किंमतीस पुरेसें स्थैर्य आणण्याचे उपाय परिणामकारक ठरणार नाहींत, असें सांगून, ग्रामीण आर्थिक जीवनांतील, शेतमालावर प्रक्रिया करणें, मालासाठी गुदामे व सांठ्याची इतर व्यवस्था करणें, यासुद्धां सर्व महत्त्वाच्या अंगांचा विचार करण्यांत आलेला सहकारी विका-साचा एक एकत्रित कार्यक्रम आंखण्यांत आल्याचें ते म्हणाले. याबाबतींत उपाय म्हणून इंपिरियल बँक ऑफ इंडियाचें स्टेट बँक ऑफ इंडिया म्हणून केलेलें रूपांतर आणि ग्रामीण विभागांत कर्जविषयक सवलती उपलब्ध व्हाव्यात म्हणून रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायद्यांत आलेली दुरुस्ती, या गोष्टी करण्यांत आल्या आहेत.

देण्याघेण्याची परिस्थिति समाधानकारक असली तरी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील विकासाचा वेग वाढणार अस-ल्यानें भविष्यकाळांत त्यावर फार ताण पडेल, असें ते म्हणाले. दुसरी पंचवार्षिक योजना ठरल्याप्रमाणें पार पाडावयाची असेल तर परदेशांतील आपल्या खात्यांत कांहीं शिल्लक ठेवणें तर आपणांस शक्य होणार नाहींच पण उलट आपणांस बरीच तूट येईल असा इशारा त्यांनीं दिला. यासाठी तागी मालासारख्या व गिरणीकापडासारख्या कांहीं प्रमुख धंद्यांना परदेशांच्या स्पर्धेस तोंड देतां यावें म्हणून त्यांच्या आधुनिकीकरणासाठी शास्त्रीय पुनर्रचनेकरितां तांतडीनें व प्रभावी उपाययोजना करून आपला निर्यात व्यापार वाढविणें आवश्यक आहे. निर्यात मालाचे उद्योगधंदे वाढविण्यासाठीं, तसेंच परकीय हुंडणावळीची बचत वा वाढ करण्यास उत्तेजन देण्याकडे हरप्रयत्न करण्याची त्यांनीं विनंति केली.

चालू करांच्या आधारें हिशेब करतां येत्या वर्षांत ४९३·६ कोटी रुपये उत्पन्न येईल व ५४५·४३ कोटी रुपये खर्च होईल असा अंदाज अर्थमंत्र्यांनीं धरलेला आहे. म्हणजे, महसुली खात्यांत ५१·८३ कोटी रुपयांची तूट राहील. गेल्या वर्षी संरक्षणा-साठीं २०३·९७ कोटी रुपये, म्हणजे चालू वर्षाच्या दुरुस्त अंदाजापेक्षा १८·९ कोटी रुपये खर्च धरलेला आहे.

पुढील वर्षीच्या मुलकी खर्चांत ४३·३७ कोटी रुपयांची वाढ अपेक्षिलेली असून ती वाढत्या विकासखर्चामुळे होइल. राष्ट्र रचनेच्या आणि विकास कार्यावर चालू वर्षापेक्षा २३ कोटी रुपये अधिक खर्च अपेक्षिलेला आहे.

चालू वर्षातील दुरुस्त भांडवली खर्च १७० कोटी रु. धरण्यांत आला असून मूळ अंदाज २२३·३ कोटी रु. खर्चाचा होता. या खर्चांत झालेल्या ५३·३ कोटी रु. बचतींपैकी ४० कोटी रु. बचत सरकारी व्यापारयोजनेच्या खर्चांत झाली. येत्या वर्षासाठीं भांडवली खर्च ३१६·७ कोटी रु. धरलेला असून त्यापैकी रेल्वेसाठी ११३ कोटी रु., संरक्षणासाठी २६·३ कोटी रु., नव्या तीन पोलाद कारखान्यांकरतां ४४ कोटी रु., स्थलांतरितांना रोख रकमेंत नुकसानभरपाई देण्यासाठी २० कोटी रु., धान्य खरेदीसाठी सरकारी व्यापाराकरतां ९·५ कोटी रु. आणि लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनसाठी ५ कोटी रु. अशी तरतूद आहे. त्याशिवाय मूळच्या ३५५ कोटी रु. अंदाजाऐवजीं या वर्षी राज्य सरकारांस आणि इतरांस प्रामुख्यानें योजनांतील कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी ३२७ कोटी रु. व पुढील वर्षी ३८६ कोटी रु. कर्जाऊ देण्यांत येतील.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा खर्च करण्यासाठी राज्य सरकारांच्या उत्पन्नाच्या साधनांच्या प्रश्नाचा निर्देश करून अर्थमंत्रि म्हणाले कीं, मध्यवर्ती तसेंच राज्य सरकारांच्या महसुली अर्थसंकल्पांत समतोलपणा असावा आणि चालू खर्च कर बसवून भागविण्यांत यावा. चालू आणि पुढील योजनांत महसुली अर्थसंकल्पांत प्रतिवार्षिक जबाबदाऱ्या वाढतच जाणार असल्यामुळें राज्यांनीं उत्पन्नाचीं नवीं साधनें शोधून काढणें भाग आहे. श्री. के. संतानम् यांच्या अध्यक्षतेखालीं नेमलेलें फायनान्स कमिशन लवकरच कामास प्रारंभ करणार आहे.

यंदां एकूण तूट २२२ कोटी रु. च्या बेतांत होईल. मूळ अर्थसंकल्पांत ती ३२७ कोटी रु. धरलेली होती. वर्षाच्या प्रारंभींची शिल्लक आवश्यक किमान ५० कोटी रु. च्या शिलकेपेक्षा १८ कोटी रु. नीं कमी असल्यानें ट्रेझरी बिलांत २४० कोटी रु. पर्यंत वाढ होईल

गतवर्षी मध्यवर्ती आणि राज्य सरकारें यांच्या गरजा भागविण्यासाठी संयुक्तरीत्या कर्जउभारणी करण्यांत आली होती. चालू वर्षी राज्य सरकारें आणि मध्यवर्ती सरकारांनीं स्वतंत्रपणें कर्जें उभारलीं. चालू वर्षांत उभारलेल्या दरसाल दर शेंकडा ३॥ टक्के दराच्या राष्ट्रीय योजना रोख्यांत, ( १९६५ दुसरी माला ) १०३·७ कोटी रु. चा भरणा झाला. छोट्या बचतींपासून ६५ कोटी रु. मिळतील असा अंदाज आहे. मूळ अंदाजांत ५२ कोटी रु. अपेक्षिलेले होते. तथापि दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत छोट्या बचतींद्वारें ५०० कोटी रु. जमा करण्याचें लक्ष्य ठरविण्यांत आलें असल्यानें ग्रामीण विभागांत बिनसरकारी व्यक्तींना या मोहिमेंत सहभागी करणें, महिलांची बचत मोहीम, बचत गटांची उभारणी, इत्यादि साधनांवर विशेष जोर देण्यासाठी खास उपाय योजणें जरूर आहे. हें कार्य अत्यंत महत्त्वाचें असून त्यांत मतभेदाला वावच नाहीं असें सांगून सर्वांनीं या कामासाठीं संपूर्ण सहकार्य द्यावें अशी अपेक्षा अर्थमंत्र्यांनीं व्यक्त केली.

पुढील वर्षासाठी एकूण ३९० कोटी रु. ची तूट अपेक्षित आहे. ही सर्व तूट ट्रेझरी बिलांत वाढ करून भागविण्यांत येईल.

मार्ग आणि साधनांच्या परिस्थितीचा थोडक्यांत परामर्ष घेतांना अर्थमंत्री अखेरीस म्हणाले कीं, सरकारला महसुलांतील तूट भागविण्यासाठी ५२ कोटी रु. ची व भांडवली खर्च आणि कर्ज यासाठी ७०३ कोटी रु. ची गरज आहे. पैकी १०० कोटी रु. बाजारपेठेंत कर्ज उभारून, ७० कोटी रु. अल्प बचतींतून, ८५ कोटी रु. परकीय साह्याद्वारें व ११० कोटी रु. किरकोळ कर्जांच्या व आर्थिक व्यवहारांच्या इतर मार्गांनीं मिळतील असा सरकारचा अंदाज आहे. हें लक्षांत घेतां अर्थसंकल्पाची तोंडमिळवणी करण्यासाठी सुमारें ३९० कोटी रु. कमी पडतात.

---

## दि बेळगांव बँक लि., बेळगांव

वरील बँकेला १९५५ मध्यें ५१,७०९ रु. नफा झाला. ५ करमाफ डिव्हिडंडसाठी ३०,००० रुपये लागतील, रिझर्व्ह व इतर फंडांत १५,००० रु. घातले जातील आणि कराच्या तरतुदीसाठी ७,००० रु. ची तरतूद केली जाईल. अहवालाच्या वर्षी ठेवींत १२,००,००० रुपयांची वाढ होऊन ठेवींची रक्कम १,०७,००,००० रुपये झाली आहे.

अहवालाच्या वर्षाचे शेवटचे दोन महिने वगळले, तर बाकीचे महिने बँकेच्या पैशास फारशी मागणी नव्हती. कारण, उतरत्या किंमतीमुळें माल साठविण्याची प्रवृत्ति राहिली नाहीं, कर्जें कमी घेतलीं गेलीं व सहाजीकच नफ्यांत घट झाली. परंतु, सालअखेर ही प्रवृत्ति थांबली व पैशाची मागणी सुधारली.

बँकेच्या ताळेबंदावरून असें दिसून येतें कीं वाढलेल्या ठेवींमुळें बँकेनें दिलेल्या व्याजांत २५ हजार रुपयांची वाढ झाली पण मिळालेल्या व्याजांत व डिस्कौंटमध्यें फक्त ४४० रुपयांची वाढ होऊं शकली. ह्याचीं कारणें वरील प्रमाणें रिपोर्टांत दिलेलींच आहेत. बँकेच्या गुंतवणुकींत व तिनें दिलेल्या कर्जांत अहवालाचे तारखेस बरीच वाढ दिसून येते; बँकेकडील ठेवी वाढल्या त्यामुळेंच ही वाढ सहज शक्य झाली आणि त्याकारणानें पुढील वर्षीच्या हिशेबावर त्याचा अनुकूल परिणाम झालेला दिसून येईल.

बँकेची स्वतःची नवी इमारत, अद्ययावत् सेफ डिपॉझिट व्हॉल्ट, पांच जिल्ह्यांत २२ शाखा, शेडयूल्ड बँकेचा दर्जा, गेल्या वर्षी साजरा झालेला रौप्यमहोत्सव, गेल्या वर्षीच रिझर्व्ह बँकेच्या लायसेन्सची प्राप्ति, संचालकांची दक्षता व सावधगिरी, ह्या सर्व गोष्टींमुळें बेळगांव बँकेची प्रगति सालोसाल होत आहे. ज्या ठिकाणीं इतर बँका कचेऱ्या उघडणार नाहींत, अशा ठिकाणीं जाऊन ह्या बँकेनें बँकिंगच्या प्रसाराची उत्कृष्ट कामगिरी प्रथमपासूनच बजावली आहे.

( चेअरमन : एम्. जी. हेरेकर; व्हाइस चेअरमन : एल. व्ही. देशपांडे; मॅ. डायरेक्टर: ए. आर. नाईक; मॅनेजर : एच एस. कुलकर्णी ).

---

## पुणें सें. को. बँकेच्या जुन्नर शाखेचा रौप्यमहोत्सव

पुणें सें. को-ऑपरेटिव्ह बँकेच्या जुन्नर शाखेचा रौप्य-महोत्सव जुन्नर येथें रविवार दि. ११ मार्च, १९५६ रोजीं सकाळीं ठीक ११ वाजतां न्यू स्कूल, जुन्नरचे पटांगणांत डॉ. हरेकृष्ण मेहताब, राज्यपाल, मुंबई राज्य, यांचे अध्यक्षतेखालीं साजरा होणार आहे.

---

**मुक्या-बहिऱ्यांना शिक्षण**— आंधळया मुक्या व बहिऱ्या लोकांना शिक्षण देण्याचें केंद्र काढण्याचें सौराष्ट्र सरकारनें ठरविलें आहे. केंद्रासाठी लागणाऱ्या ३ लाख रुपयांपैकीं निम्मी रक्कम एका धर्मादाय ट्रस्टकडून मिळणार आहे.

## लहान बँकांचे बाबतींत नवा व लवचिक दृष्टिकोन हवा

### स्थानिक बँकांची वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी : रिझर्व्ह बँकेला सूचना

[ वा. पुं. वर्दे, ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर, मुंबई प्रां. सहकारी बँक, लि. व चेअरमन, बँक ऑफ महाराष्ट्र लि. ]

रूरल क्रेडिट सर्व्हे रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यानंतर शेतकऱ्यांस कर्ज पुरविण्याची तरतूद करणारे उपाय योजण्यांत आले आहेत. त्यांचा पूर्ण परिणाम पुढील पांच किंवा दहा वर्षांत दिसून येईल. पण शहरांतील व बिनशहरी विभागांतील छोटे व्यापारी, कारागीर ( आर्टिझन ) आणि कारखानदार यांच्या गरजा व त्या भागविण्याचे योग्य उपाय यांकडे अद्यापिहि आवश्यक तें लक्ष देण्यांत येत नाहीं याचें वाईट वाटतें. एकीकडे छोट्या व मध्यम उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्यासाठीं योजना आंखण्यांत येत आहेत, तर दुसरीकडे या लहान कर्जे काढणाऱ्या वर्गांतील लोकांना हवीं असणारीं कर्जें पुरविण्याच्या सवलती आहेत कीं नाहींत हें तपासण्याचे फारच थोडे प्रयत्न होत आहेत. स्टेट फिनॅन्शियल कॉर्पोरेशन्स व उद्योगधंद्यांना सरकारी मदत म्हणून अशा प्रकारच्या इतर योजना स्वागतार्ह असल्या तरी त्या पुरेशा नाहींत. शिवाय लहानसहान कर्जें काढणाऱ्यांच्या गरजांचें समाधान करण्यास सरकारी संस्थांमार्फत मिळणारी मदत अनेक कारणांमुळें तितकीशी फलदायक आणि परिणामकारक असूं शकणार नाहीं. त्यांच्या गरजा भागविण्यासाठीं बँकिंग पद्धतींतून कर्जें मिळालीं पाहिजेत व केवळ छोट्या स्थानिक बँकांमधूनच छोटे कारागीर व कारखानदार यांच्या गरजा पुरेशा भागूं शकतील अशी माझी खात्री आहे. शेतकऱ्यांना कर्जें पुरविण्यासाठीं सरकारनें व रिझर्व्ह बँकेनें धोरण जाहीर केलें आहे; पण दुर्दैवानें कमर्शियल बँकिंग संबंधीं असलें धोरणविषयक निर्णय ठरलेला नाहीं. कमर्शियल बँकिंग संबंधीच्या कोणत्याहि राष्ट्रीय धोरणांत देशाच्या विकासाच्या सद्यःस्थितींत मोठ्या बँकांच्या शाखा उघडण्यास उत्तेजन द्यावयाचें कीं स्थानिक बँका स्थापन करण्यास उत्तेजन द्यावयाचें, या मध्यवर्ती मुद्याबद्दल निर्णय ठरविला पाहिजे.

शेतकरी आणि शहरांतील लहान व्यापारी व कारखानदार यांचा प्रश्नहि तसाच आहे. दोन्ही बाबतींत जोर द्यावयाचा तो सुरक्षिततेवर नव्हे, तर कर्जांच्या लायक उपयोगावर होय. कर्ज देतांना विश्वास, ऋणकोचें चारित्र्य आणि कर्जाचा विनियोग कसा करण्यांत येतो यावर सतत, अखंड आणि उपकारक देखरेख करतां येण्याचा संभव या बाबींकडे लक्ष दिलें पाहिजे. बँकर्स स्थानिक असले तरच या अटींची पूर्तता होऊं शकेल. बँक को-ऑपरेटिव्ह आहे कीं जॉईंट स्टॉक बँक आहे, त्याला विशेष महत्त्व नाहीं. कर्जांच्या, योग्य उपयोगाच्या आधारावरच कर्ज दिलें पाहिजे. त्यासाठीं व्यक्तिगत ओळखदेख, देखरेख आवश्यक असते. मोठ्या बँकांच्या शाखांना हें आवश्यक कार्य करणें शक्य नाहीं. त्या शाखा हेड ऑफिसांनीं घालून दिलेल्या सर्वसाधारण धोरणांनीं बांधलेल्या असतात. परिणामीं त्यांचा भर कर्जाच्या सुरक्षितपणावर राहील; स्वरूपावर राहणार नाहीं.

युनायटेड स्टेटस् सारख्या औद्योगिक दृष्टीनें पुढारलेल्या देशांत देखील बँकांनीं लहान व मध्यम व्यापाऱ्यांना दिलेल्या कर्जांपैकी तीन चतुर्थांशाहून अधिक कर्जें हीं नुसत्या सहीवर दिलेलीं कर्जें असतात; अमूक एका तारणावर दिलेलीं नसतात. युनायटेड स्टेटस् ऑफिस ऑफ बिझिनेस इकॉनॉमिक्सनें नुकत्याच केलेल्या पाहणीवरून मी ही आंकडेवारी घेतली आहे. आमच्या देशासारख्या कमी विकसित देशांत अशा प्रकारें सहीवर कर्जें मिळविण्याची गरज अर्थात् अधिकच आहे. स्थानिक परिस्थितीची व ऋणकोची अगदीं जवळून माहिती असलेल्या स्थानिक बँकाच अशा प्रकारचीं कर्जें परिणामकारक रीतीनें देऊं शकतील हेंहि उघड आहे.

या छोट्या बँकांविषयीं मी बोलतों तेव्हां भक्कम नसलेल्या बँकांचा विचार माझ्या मनांत नसतो. बँकिंग प्रॅक्टिसिस चोख असल्याच पाहिजेत; यावर आपण अर्थातच भर दिला पाहिजे. बँका छोट्या असूनहि भक्कम असूं शकतात. भक्कमपणाचा आकाराशीं संबंध नसतो. त्याबरोबरच मोठ्या बँका व छोट्या बँका यांच्यांत अंगभूत स्पर्धाच असते, असेंहि मला सुचवायचें नाहीं. मला एवढेंच सांगावयाचें आहे कीं, फक्त स्थानिक बँकाच छोट्या व्यक्तींना कर्जें देण्याचें कार्य परिणामकारकरीत्या करूं शकतात. हें कार्य करण्यास छोट्या बँकांना मोठ्या बँकांच्या मदतीची जरूरी लागेल. या दोन्ही बँका निरनिराळ्या क्षेत्रांत काम करीत असल्या तरी त्यांच्यांत सहकार्य हवें, सुसूत्रता हवी. मोठ्या बँकांनीं लहान व मोठ्या शहरांत आपल्या शाखांचें जाळें विणण्याची जशी जरूरी नाहीं, तसेंच स्थानिक बँकांनीं दूरच्या विभागांत हात पाय न पसरतां मोठ्या बँकांशीं संलग्न

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
राष्ट्रीय बचत योजना
व्याज ३ टक्के
माहितीसाठीं लिहा अगर भेटा
मुख्य ऑफीस: सारस्वत बँक बिल्डींग, मुंबई ४
शाखा: फोर्ट, दादर, माहीम, बेळगांव, पुणें

तमाम दंतरोगांवर
☆ ... म्हणजेच ...ळी टूथ पावडर ☆

झालें पाहिजे. स्टेट बँक अधिकाधिक शहरांत आपल्या कचेऱ्या उघडीत आहेत. तिच्याशीहि स्थानिक बँकांचें असलेंच सहकार्य असलें पाहिजे. शेतकऱ्यांना कर्जें उपलब्ध करून देण्यासाठी जशी सुसूत्र व्यवस्था करण्यांत आली आहे, तशीच व्यवस्था कमर्शियल बँकिंगसाठी होणेंहि आवश्यक आहे.

या योजनेसाठी तांतडीची प्राथमिक बाब म्हणून राष्ट्रीय विकासकार्यांत हल्लींच्या स्थानिक बँका जें कार्य करीत आहेत, त्याचें चीज म्हणून त्यांचा खास विचार केला पाहिजे. या संबंधांत रिझर्व्ह बँकेला दोन सूचना कराव्याशा वाटतात. पहिली ही कीं, नॉन-शेडयूल्ड बँकांच्या अडचणी व त्यांच्यासमोरील प्रश्न यांची माहिती व्हावी म्हणून त्या बँकांची एक सल्लागार समिती असावी. दुसरी सूचना अशी कीं, नॉन-शेडयूल्ड बँकांच्या इन्स्पेक्शनच्या बाबतींत अधिक रचनात्मक भूमिका पत्करली तर ती अशा लहान बँकांच्या विकासास उपकारक ठरेल. या बाबतींत मोठ्या बँकांच्या बाबतींत लावण्यांत येणाऱ्या कसोट्या लहान बँकांच्या बाबतींत सौम्य कराव्या अशी जी शिफारस श्रॉफ कमिटीनें केली आहे तिचा मी पुरस्कार करतों. ओव्हर एक्स्टेन्डेड लोन्स संबंधीं सेंट्रल बँकिंग ॲथॉरिटी तक्रार करते तेव्हां बँकेच्या मालकीचें भांडवलहि हिशेबांत धरलें पाहिजे. याशिवाय डिमांड आणि टाईम देण्याचें एकूण ठेवींशीं प्रमाणहि विचारांत घेतलें पाहिजे. कारण, बड्या शहरांशीं तुलना करतां छोट्या शहरांत टाइमदेणीं अधिक असतात. ही वस्तुस्थिति लक्षांत घेतली तर ओव्हर एक्स्टेन्डेड वाटणारीं कर्जें तशीं वाटणार नाहींत. शिवाय कर्जफेडीची मापकाठी, तीं कर्जें आपोआप कमी होणारीं आणि वर्षभरांत शून्यावर येणारीं आहेत कीं नाहींत; ही असतां कामा नये. ती मापकाठी त्या कर्जांचा उपयोग योग्यरीतीनें झाला आहे कीं नाहीं व टर्नओव्हर वाढला आहे कीं नाहीं ही असली पाहिजे. शेवटीं या आधींच मी सांगितल्याप्रमाणें, स्थानिक बँकांच्या कार्याचें स्वरूप लक्षांत घेऊन सुरक्षितेवर भर न देतां कर्जाचा योग्य उपयोग केला जातो कीं नाहीं यावर भर दिला पाहिजे. माझ्या मतें या बँकांच्या इन्स्पेक्शनच्या बाबतींत नवा व लवचिक दृष्टिकोन स्वीकारणें आवश्यक आहे. अशा लहान बँकांना मित्रत्वाचा सल्ला देण्यासाठी व मार्गदर्शन करण्यासाठी एक निराळें खातें उघडल्यानें अधिक महत्त्वाचें कार्य साधेल कीं नाहीं याचाहि विचार रिझर्व्ह बँकेनें करावा. आपल्या गाऱ्हाण्यांची दाद लागावी म्हणून नॉन-शेडयूल्ड बँकांनीं एक असोसिएशन स्थापन केली पाहिजे.

— हुबळी सिटी बँकेच्या रौप्यमहोत्सव प्रसंगीं केलेलें भाषण

---

**कागदाच्या गिरणीचा विस्तार**—राजमहेंद्री येथील सरकारी मालकीच्या कागदाच्या कारखान्याचा विस्तार करण्याची योजना नियोजन समितीनें मंजूर केली आहे. ह्या कामासाठी ७५ लाख रुपये लागणार आहेत. विस्ताराची योजना पूर्ण झाल्यावर कारखान्याचें उत्पादन दुप्पट होईल व गिरणी फायदेशीर होईल. सध्यां तींत रोज १० टन कागद तयार होतो.

**अणुयुद्धाला तोंड देण्याची तयारी**—अणुबॉंबचें युद्ध झालेंच तर ब्रिटनमधील मोठ्या शहरांतील १·२ कोटी लोकांना सुरक्षित ठिकाणीं हलविण्याची योजना तयार ठेवण्यांत आली आहे. लहान मुलें, माता, म्हातारे व आजारी ह्यांना प्रथम हलविण्याची तरतूद करण्यांत आली आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळच्या व्यवस्थेपेक्षा ही व्यवस्था फार मोठ्या प्रमाणावर आहे.

## भारतामधील अर्थव्यवस्थेचीं लक्षणें

भारतीय सरकारचे व्यापार व उद्योगमंत्री श्री. कृष्णम्माचारी ह्यांनीं दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ह्या संस्थेपुढें बोलतांना भारतामधील सध्यांच्या अर्थव्यवस्थेसंबंधीं कांहीं विचार व्यक्त केले आहेत. आपल्या भाषणांत ते म्हणाले, कीं देशांत मक्तेदारी स्वरूपाची भांडवलशाही अस्तित्वांतच नाहीं. कारण भारतीय सरकारचें भांडवलशाहीवर संपूर्ण नियंत्रण आहे. विकेंद्रित अर्थ-व्यवस्था आणि केंद्रित औद्योगीकरण ह्या दोन्ही पद्धतींत गुण-दोष हे आहेतच. भारताची सध्यांची अर्थव्यवस्था कांहीं विशिष्ट अवस्थेंत आहे. आपला देश पूर्णपणें विकसित झालेला आहे असें म्हणतां येणार नाहीं. पण तो अविकसित आहे असेंहि म्हणणें बरोबर होणार नाहीं. अशा परिस्थितींत कांहीं प्रमाणांत तडजोडीचा मार्ग स्वीकारणें अनिवार्य होऊन बसतें. आज जे लोक हातमागावर कापड काढीत आहेत त्यांना कांहीं काळानें कमी काम व अधिक दाम मागण्याची बुद्धि होणें शक्य आहे, आणि त्यांत न समजण्यासारखें असेंहि कांहीं नाहीं. देशांत भांडवल जमविण्याचीं साधनें अपुरीं असल्यामुळें ह्या बाबतींत तडजोड करण्याशिवाय दुसरा मार्गच रहात नाहीं. आधुनिक पद्धतीच्या उत्पादनतंत्राचा सर्वत्र अवलंब करावयाचा असें जर आपण ठरविलें तर सर्व लोकांना काम देतां येणें आपणांस शक्य होणार नाहीं. अर्थशास्त्रज्ञांनीं आपले विचार व्यक्त करतांना किमान सचोटी दाखविणें जरूर आहे. येत्या पांच-सहा वर्षांच्या कालांत अर्थशास्त्रज्ञांनीं आपलीं मतें निर्भीडपणें बोलून दाखविलीं नाहींत तर त्यांची लोकप्रियता उताराला लागेल असा इषारा मला द्यावासा वाटतो.

---

## शेतीच्या उत्पन्नावर प्राप्तीचा कर

पंजाब राज्य सरकारनें शेतीच्या उत्पन्नावर प्राप्तीवरील कर घेण्याचें ठरविलें आहे. जे जमीनमालक दरसाल ७० रुपयांच्या-वर शेतसारा भरीत असतील त्यांच्यावर हा कर चढत्या श्रेणीनें बसविण्यांत येणार आहे. राज्य सरकारच्या कायदेमंडळानें कराला मंजुरी दिल्यावर तो अंमलांत आणण्यांत येणार आहे. ह्यासाठीं जरूर असणारें बिल कायदेमंडळांत स्वतंत्रपणें आण-ण्यांत येईल अगर त्याचा समावेश फिनॅन्स बिलांत करण्यांत येईल. जे जमीन मालक दरसाल १,००० रुपयांपासून २,००० रुपयांपर्यंत शेतसारा भरीत असतील त्यांच्यावर जास्तींत जास्त २०० टक्के जादा कर बसविण्याची व्यवस्था करण्यांत येणार आहे. दरसाल ७१ रुपयांपासून १०० रुपयांपर्यंत शेतसारा भरणाऱ्यांचा अगदीं खालच्या गटांत समावेश करण्यांत आलेला आहे. ह्या गटांतील जमीन मालकांवर जितका शेतसारा बस-विण्यांत येईल त्याच्या ५० टक्के रक्कम शेतीच्या प्राप्तीवरील जादा कर म्हणून द्यावा लागणार आहे. राज्य सरकारनें आख-लेल्या बऱ्याच विकास योजनांना पैशाची गरज आहे. हा पैसा शक्य तितका राज्यांतल्या राज्यांतच उभा करण्याचा सरकारचा हेतु आहे. म्हणून शेतीचा व्यवसाय करणारांवर हा कराचा बोजा लादण्यांत येत आहे. तथापि हा बोजा अगदींच ओझ्याच्या स्वरूपाचा म्हणतां येणार नाहीं. कारण, दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत ग्रामीण जनतेला बऱ्याच सुखसोयी उप-लब्ध करून देण्यांत येणार आहेत. पंजाबमधील शहरवासीयांवरहि सरकार अधिक कर बसविण्याचा विचार करीत आहे. शहरांत वास्तव्य करणारांवर व्यवसाय कर बसविला जाण्याची शक्यता आहे.

## मध्यवर्ती सरकारचें अंदाजपत्रक

( आंकडे लक्ष रुपयांचे )

| | १९५५-५६ अंदाज | १९५५-५६ दुरुस्त | १९५६-५७ अंदाज |
|---|---|---|---|
| **उत्पन्न** | | | |
| कस्टम्स | १६४,५० | १३५,०० | १५०,०० |
| एक्साईज | १३२,२७ | १४०,०० | १४५,४५ |
| | | | +२,५०० |
| कॉर्पोरेशन टॅक्स | ३९,७७ | ३९,८१ | ४१,४८ |
| | | | +६,५० |
| इन्कमटॅक्स | ७६,९६ | ७८,७० | ८४,८१ |
| | | | +१,७० |
| एस्टेट ड्यूटी | २१ | १३ | १८ |
| अफू | २,०० | २,२७ | २,१० |
| व्याज | २,९१ | ४,२२ | ५,४९ |
| मुलकी कारभार | १०,५४ | १४,२१ | ११,०६ |
| चलन, टांकसाळ | २३,१८ | २३,१३ | २३,६७ |
| सिव्हिल वर्क्स | १,९० | २,३८ | २,३९ |
| इतर | २०.४९ | २३,३५ | १९,३९ |
| पोस्ट–तार-खात्याचा वाढावा | ७० | २,२७ | ६५ |
| | | | +९५ |
| रेल्वे-खात्याचा वाढावा | ६,१५ | ६,१७ | ६,५७ |
| एकूण उत्पन्न | ४८१,५८ | ५०१,६७ | ४९३,६० |
| | | | +३४,१५ |
| **खर्च** | | | |
| उत्पन्न मिळविण्यासाठी खर्च | ३३,१३ | ३३,०८ | ३७,१५ |
| इरिगेशन | १३ | १२ | ५ |
| कर्जविषयक | ३९,२० | ३७,८५ | ३५,५० |
| कारभार | १११,७६ | १०५,४१ | १३५,९१ |
| चलन, टांकसाळ | ३,३६ | ३,५१ | ३,७६ |
| सिव्हिल वर्क्स | १६,३३ | १४,९५ | १५,९० |
| पेन्शन्स | ९,१३ | ८,९८ | ८,८४ |
| निर्वासितांवरील खर्च | १०,३७ | २४,६२ | २१,४२ |
| इतर खर्च | २३,७२ | २६,६२ | ३०,२३ |
| राज्यांना ग्रँट | ३५,९३ | ३५,७९ | ३८,०० |
| विशेष बाबी | १३,१९ | १३,३६ | १४,७० |
| लष्करी खर्च | २०२,६८ | १८५,०७ | २०३,९७ |
| एकूण खर्च | ४९८,९३ | ४८९,३६ | ५४५,४३ |
| | −१७,३५ | +१२,३१ | −१७,६८ |
| | तूट | वाढावा | तूट |

**हुबळी भागांत दुधाचा पुरवठा**—हुबळी–धारवाड भागांत सरकारनें दुधाचा पुरवठा करण्याची योजना ५ वर्षांपूर्वी चालू केली. ह्या योजनेमुळें ४० खेडेगांवांतील सुमारें ७५० शेतकऱ्यांच्या दुधाला निश्चित गिऱ्हाईक मिळालें असून धारवाडमधील ८०० कुटुंबांना सकस दुधाचा पुरवठा होऊं लागला आहे. इस्पितळें, क्लब्ज, ह्यांनाहि दूध पुरविण्यांत येतें.

**गांधींच्या स्मारकावर वीज चमकणार**—जबलपूरपासून ९ मैलांवर तिलवारघाट ह्या ठिकाणीं नर्मदेच्या कांठीं महात्माजींचें स्मारक बांधण्यांत आलें आहे. ह्या स्मारकावर आतां विजेची रोषणाई करण्यांत येणार आहे. ह्या ठिकाणीं महात्माजींच्या कांहीं अस्थी नर्मदेंत विसर्जित करण्यांत आल्या होत्या.

## बजेटांचा आढावा

( आंकडे कोटी रुपयांचे )

| | १९५५-५६ अंदाज | १९५५-५६ दुरुस्त | १९५६-५७ अंदाज |
|---|---|---|---|
| उत्पन्न | ४८१·५८ | ५०१ ६७ | ४९३·६ |
| खर्च | ४९८·९३ | ४८९·३६ | ५४५·४३ |
| वाढावा अथवा तूट | १७·३५ (वाढावा) | १२·३१ (तूट) | ५१·८३ (तूट) |
| नवा कर | | | ३४·१५ |
| अखेरची तूट | | | १५·६८ |

| | सर्व बाबी धरून येणारी तूट | तूट भरून काढण्याचे मार्ग | |
|---|---|---|---|
| उत्पन्न व खर्चांतील तूट | ५२ कोटी रु. | कर्ज | १०० |
| भांडवली खर्च | ७०३ „ | अल्प बचत | ७० |
| | ७५५ | परदेशीय मदत | ८५ |
| | −३६५ | इतर | ११० |
| एकूण तूट | ३९० कोटी रु. | | ३६५ |

## चहाचें उत्पादन कमी करण्याचा निर्णय

पूर्व भारतामधील चहाच्या मळेवाल्यांच्या संघटनेनें चहाचें उत्पादन कमी करण्याचें ठरविलें आहे, असें समजतें. चहाच्या निर्यातीच्या जागतिक व्यापारांत भारताचें स्थान महत्त्वाचें असल्यानें कोणत्याहि कारणानें उत्पादनांत घट करणें अनिष्ट ठरणार आहे. चहाच्या लागवडीखालील जमीन कमी करण्याचें धोरण भारतीय सरकारलाहि पसंत नाहीं. टी बोर्डाचे अध्यक्ष श्री. यू. के. घोसळ ह्यांनीं कलकत्ता येथील रोटरी क्लबांत बोलतांना ह्याविषयासंबंधीच्या सरकारी भूमिकेचा खुलासा केला आहे. ते म्हणाले कीं सध्यां चहाच्या निर्यात बाजारपेठेंत बरीच स्पर्धा आहे. अशावेळीं भारतामधील चहाच्या उत्पादनांत मुद्दाम घट करण्यांत आली तर भारतामधील चहाला परदेशीय बाजारपेठेंतील आपला व्यापार-व्यवहार गुंडाळावा लागण्याचा धोका उत्पन्न होईल. चालू वर्षी भरमसाठ उत्पादनामुळें चहाच्या धंद्याला कठीण परिस्थितीला तोंड द्यावें लागणार आहे, ही गोष्ट खरी आहे. पण उत्पादन कमी करण्याचा मार्ग योग्य होणार नाहीं. आंतरराष्ट्रीय बाजारपेठांतून भारतीय चहाला स्पर्धा होत आहे. अशा वेळीं देशांतील दरमाणशीं चहाच्या खपाचें प्रमाण वाढविणें हाच खात्रीचा उपाय आहे. सध्यां भारतांत दरसाल दरमाणशीं अवघा अर्धा पौंड चहा खपतो. हें प्रमाण १ पौंडावर आणणें जरूर आहे. अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, मध्यपूर्व व न्यूझीलंड ह्या देशांतून भारतीय चहासाठी नवी बाजारपेठ मिळविण्याचे प्रयत्न सरकारतर्फे करण्यांत येत आहेत. त्याशिवाय, जुन्या बाजारपेठांतून चहाचा अधिक प्रसार करण्याचेहि प्रयत्न होत आहेत. पण नव्या बाजारपेठांचा विकास होणें ही बाब चटकन होणारी नाहीं.

### ग्रेट ब्रिटनमधील बड्या सात बँकांचे नफे व डिव्हिडंड
### १९५२–५५

| | १९५२ पौंड | १९५३ पौंड | १९५४ पौंड | १९५५ पौंड | १९५५ मधील बदल % |
|---|---|---|---|---|---|
| बार्कलेज् | २१,३७,७२२<br>८·८% | २३,००,१५० <br>१०% | २५,४९,३९९<br>१२% | २६,४५,३८१<br>१२% | + ३·८ |
| लॉइड्स | १९,६४,६६५<br>९·६% | २०,८३,७८१<br>११·२% | २१,८६,०७२<br>१२% | २३,२२,४३९<br>१२% | + ६·२ |
| मिडलंड | २०,७४,८८७<br>१६% | २१,२७,२०२<br>१६% | २३,९७,५९७<br>१८% | २६,५४,११०<br>१८% | + १०·७ |
| नॅ. प्रॉव्हिन्शिअल | १५,२५,१०३<br>१६% | १७,६५,७६८<br>१७% | १८,२७,०४४<br>१८% | १८,८२,१३९<br>१८% | + ३·० |
| वेस्ट मिन्स्टर | १४,४६,५४६<br>१४% | १४,७४,७३६<br>१४·४% | १६,२३,१९७<br>१६% | १७,०८,३१६<br>१६% | + ५·२ |
| "बड्यापांचां"ची बेरीज | ९१,४८,८३३ | ९७,५१,६३७ | १,०५,८३,३०९ | १,१२,१२,३८५ | + ५·९ |
| मार्टिन्स | ७,४६,३०९<br>१५% | ८,१९,९२१<br>१७½% | ९,१८,४७७<br>१७½% | ९,३०,६१६<br>१७½% | + १·३ |
| डिस्ट्रिक्ट | ५,१५,६७२<br>१८½% | ५,५९,७४४<br>२०% | ५,८८,८६३<br>२०% | ६,३६,७८४<br>२०% | + ८·१ |
| "बड्या सातां"ची बेरीज | १,०४,१०,८१४ | १,११,३१.३०२ | १,२०,९०,६४९ | १,२७,७९,७८५ | + ५·७ |


## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक ) खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. के. पां. जोशी ( अध्यक्ष ) | श्री. ह. व. गिरमे ( उपाध्यक्ष )

अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०

विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०

वसूल भांडवल रु. ४,००,०००

रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह रु. १,००,०००

**एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर**

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

## दि सांगली बँक लि.

सांगली.

स्थापना १९१६ : शेडयूल्ड बँक

वसूल भांडवल रु. ४,५०,०००

रिझर्व्हस् व इतर फंडस् रु. ६,२५,०००

एकूण खेळतें भांडवल रु. १,५०,००,०००

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठे महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर व मुंबई.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.